
# सहज पाठ



रवींद्रनाथ टागोर

# रवींद्रनाथ टागोर



आपल्या देशात अनेक महान व्यक्ती होऊन गेले, त्यापैकीच एक म्हणजे **गुरुदेव रवींद्रनाथ टागोर.** ते १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक जिंकणारे जगातील पहिले गैर-युरोपियन आणि साहित्यातील पहिले गीतकार बनले.

**सहजपाठ** ही टागोरांची बंगालला सर्वात मोठी देणगी आहे. पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्या "**बंगवासी**" पुस्तकात म्हणाल्याप्रमाणे, "रविंद्रनाथजी नी  हजारो कविता लिहिल्या, नाटके लिहिली , कादंबऱ्या, प्रवासवर्णने, पत्रे, निबंध आणि खूप काही लिहिले, पण रवींद्रनाथ टागोर यांच्यापुढे जर मनोमन लोटांगण घालायचे असेल तर ते प्राथमिक शाळेची पाठ्यपुस्तके "**सहजपाठ**" रचल्याबद्दल !"

# “प्रस्तावना”

**“सहजपाठ”** ही  रस, गंध, नाद यांच्या सृष्टीतली आनंददायक सहल आहे. बंगाल्याच्या  गेल्या चार पिढ्या ह्या पुस्तकातून शिकत आहेत. खेड्यातील मुले डोळयासमोर ठेवून गुरुदेवांनी  खूप वर्षापूर्वी हे “**सहजपाठ**” रचले.

गुरुदेवांनी प्राथमिक शिक्षणाची  रुची नसलेल्या, सल्ला देणाऱ्या धड्यांचे अतिशय चैतन्य पूर्ण, गीतात्मक  स्वरुपात  रूपांतर केले. मुलांना बंगाली अक्षरे शिकवण्याची पद्धत त्यांनी पूर्णपणे बदलून टाकली. सहजपाठ  मधील प्रत्येक मुळाक्षर हे कविता आणि लहान मुलांच्या जगाचे रेखाचित्र घेऊन येते, जे लक्षात ठेवण्यास अगदी सोपे आहे. निसर्ग, झाडे, पक्षी, फळे, सण, जत्रा इत्यादी गोष्टींबद्दल ते लिहितात, ज्या मुलांना परिचित आहेत. या वर्णनांमुळे धडे खूप आनंददायी होतात. प्रत्येक धड्यात **नंदलाल बोस**  यांनी रेखाटलेले मुलांनी रंगविण्यासाठी चित्र टाकले आहे . रवींद्रनाथांना मुलांनी त्यांची सृजनशीलता, सौंदर्य, आनंद, या चित्रांतून व्यक्त करावा असे वाटत होते.

‘सहजपाठ’ मध्ये आणखी एक गोष्ट काटेकोरपणे पाळली जाते ती म्हणजे, मुलांना कोणताही सल्ला दिला जात नाही, धड्याच्या शेवटी कोणतेही स्वाध्याय  नाहीत. वाचायला शिकताना फक्त मजाच येते. लहान मुलापासून ते  आजोबांपर्यंत सर्वजण रवींद्रनाथ टागोरांनी लिहिलेल्या कविता वाचू शकतात, गाऊ शकतात आणि त्यांचा आनंद घेऊ शकतात.

असे हे “**सहजपाठ”** मराठी भाषिक मुलांनाही अनुभवण्यास मिळावे हे मनापासून वाटले. पण हे एकटीने कसे पूर्ण करावे, असा प्रश्न माझ्यासमोर होता. त्यातही सगळ्यात महत्वाचे काम होते ते भाषांतराचे. जेव्हा मी अनेकांशी याविषयी बोलले, तेव्हा सहजपाठ च्या मराठी भाषांतरासाठी **अपर्णा झा** आणि **मंजिरी धामणकर** यांची मला साथ मिळाली. त्याचेच फलस्वरूप म्हणजे हे मराठी भाषांतरीत “**सहजपाठ**”.

याव्यतिरिक्त “**सहजपाठ”** मधील मराठी भाषांतरीत कविता ह्या  मुलांपर्यंत ऑडिओ-व्हिडिओ च्या माध्यमातून पोहचवावेत यासाठी हा  छोटासा प्रयत्न केला आहे. ज्या  मूळ बंगाली भाषेतील कविता आहेत त्यांचेही ऑडिओ-व्हिडिओ तयार केले आहेत, विशेष म्हणजे बंगाली कवितांच्या व्हिडिओमध्ये मथळा *रोमन* आणि *देवनागरी* लिपीमध्ये लिहिल्यामुळे, ज्यांना बंगाली वाचता येत नाही त्यांनाही वाचण्याचा आनंद मिळतो. हे व्हिडिओ स्वाधार संस्थेकडे आणि संस्थेच्या YouTube channel वर उपलब्ध आहेत.

मराठी भाषांतरीत “**सहजपाठ**” ला पुस्तकाचे स्वरुप देण्याचे, तसेच मराठी आणि बंगाली भाषेत व्हिडिओ तयार करण्याचे काम **प्रोग्राम मॅनेजर रोहिणी हुलगणे** हिने केले आहे.

**- अंजली बापट (अध्यक्ष-स्वाधार IDWC, पुणे)**



# अ, आ

छोटं बाळ बोले **अ, आ,**

शिकतंय अजून बोलाया.



# इ, ई

ऱ्हस्व इ दीर्घ ई,

बसून खातात पेढा नी लाही.



# उ, ऊ

ऱ्हस्व उ दीर्घ ऊ,


ओरडतात भू भू.



# ऋ

काळ्या ढगात गडगड री,

अवघा दिवस कंटाळ्यावरी.



# ए, ऐ


हातात वाटी ए, ऐ,
मोठ्याने मागतात दे पै.



# ओ, औ

हाका मारतात ओ, औ,


भात वाढा गरम मऊ.



# क, ख, ग, घ

**कखगघ** गाणी गातात,

कोळ्याची नाव जाते वहात.



# ङ

वाळवंटात बसून चुलीवर रांधतो,

डोळ्याला त्याच्या धूर लागतो.



# च, छ, ज, झ

**च छ ज झ** सारे मिळून,

बाजारात जातात ओझी घेऊन.



# ञ

भुकेली बाळी | छोटी ‘इयो’,
झोपून रडते कियों कियों.



# ट, ठ, ड, ढ

**टठडढ** आकार गोल,

वाजवतात घेऊन खांद्यावर ढोल.



# **ण**

बोले मूर्धन्य **ण**,

चूप बस पाठ म्हण.



# त थ द ध

**तथदध** म्हणतात भाऊ,

आंबे पाडू चला जाऊ.



**न**

रागावून म्हणतो दन्त्य **न**,

कधी नाही जाणार ह्या इथून.



# प फ ब भ

**पफबभ** शेतात जातात,

दिवसभर गवत कापतात.



# म

**म** चालवतो बैलगाडी,

धान्य घेऊन जाय वाडी.



# य र ल व

**यरलव** घरातल्या घरात,

मन लावून वाचन करतात.



# श, ष, स

**शषस** पावसाच्या वेळी,

डोक्यावर धरतात छत्री काळी.



# ह, क्ष

शाल लपेटून ह आणि क्ष,

कोपऱ्यात बसून घरावर लक्ष.



## पाठ क्रमांक १

वाघ वनात राहतात.

पक्षी झाडावर राहतात.

मासे पाण्यात राहतात.

फळं फांदीवर आहेत.

पक्षी फळं खातात.

पंख पसरून उडतात.

आमराईत वाघ आहे .

त्याच्या अंगावर गोल गोल डाग आहेत.

पक्षी वनात गाणी गातात .

मासे पाण्यात खेळतात.

फांदी फांदीवर कावळे ओरडतात.

तळयात बगळे मासे पकडतात.

वनात खूप माश्या उडतात.

त्या साऱ्या मधमाश्या आहेत,

तिकडे मधाचं पोळं आहे.

त्यात मध भरलेला आहे.

# कविता क्रमांक १- उजाडले भय गेले

उजाडले – भय गेले.
चारी दिशा – सोने जश्या.
नदी, तळे – झिळमिळे
काऊ सारे – कोकती रे.
वारा खेळे – वनमेळे
वेळू बन – हे नर्तन!
झाऊ शाखा- देते ठेका
वृद्ध दाई – जागी नाही.
खुदिराम – पाडी जाम
गिरिधारी – वल्हे मारी .
बीरबल – धरे हल
अविनाश – कापे घास
हरिहर- बांधे घर
पातू पाल – आणे साळ
दीननाथ – रांधे भात
रमापती – करे शेती.

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**रात्र संपून उजाडतानाचे हे वर्णन. सकाळच्या वेळचे प्रसन्न वातावरण आणि कामाला लागलेल्या लोकांचे वर्णन यात आहे.**



## पाठ क्रमांक २

राम वनात फुलं तोडतो. त्याच्या अंगावर लाल शाल आहे.
त्याच्या हातात परडी आहे.तो जास्वंदाची फुलं तोडतो , मोगऱ्याची फुलं तोडतो.
मोगऱ्याची फुलं पांढरी आणि जास्वंदाची- फुलं लाल आहेत, पाण्यात पाणकमळ आहे.
फुलं तोडून राम घरी जातो. त्याच्या घरी आज पूजा आहे. पूजा रात्री होणार आहे.
त्यासाठी राम फुलं आणतो. त्याच्या घरी आज खूप धूमधाम आहे.
ढाक वाजतोय, ढोल वाजतोय, घराघरात धुप दरवळतो.
रस्त्यावर लोक खूप चाललेत. बैल खूप गाड्या ओढताहेत.
हा चाललाय ‘भोला’ माळी,माळा घेऊन पळतोय.
छोटा मुलगा झोपाळयावर बसून झोके घेतोय.
थाळी भरून ‘कोई’ मासे  आणि ‘बाटा’ मासे. परळ भरून साखर, आणि पनीर आहे.
गाड्या भरून भाज्या,
भोपळे, बटाटे, आणि केळी आलीत. पाणक्या (भारवाहक ) आणतोय,
घागरी-घागरी पाणी. नोकर परळी, कुल्हड, केळीची पानं आणतो.
रात्री रोषणाई होणाराय. लाल दिवे, निळे दिवे असतील. खूप लोक जेवतील.
खूप लोक गाणी गातील. सात दिवस सुट्टी असेल, तिघे भाऊ मिळून खेळतील.

# कविता क्रमांक २-  काळी रात्र दूर गेली

काळी रात्र दूर गेली
उजेडाने हाकलली.
पूर्वेकडे जागी झाली
आरक्त उषा हसली.
कुठूनसा कोण रे तो
चांदोबाला बोलावतो!
वाट शोधे भीतीने तो
म्हणूनी चंद्र धावतो.
तारका घेऊनी वात
जाग्या होत्या सारी रात.
चुकूनिया आल्या खाली
मोगरा, जुईच्या फूली
वारा चहूदिशी वाहे
सकल जनांना बाहे.
वनी पक्षी जागे होती
मेघ रंगुनिया जाती.
जळी तरंग उठती
वृक्षी फुले उमलती.

मराठी व्हिडिओ

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**या कवितेत देखील सकाळचेच वर्णन आहे. चंद्र मावळला असे नुसते न म्हणता टागोर म्हणतात, की अंधारात वाट शोधणाऱ्या कोणाला तरी भीती वाटत होती म्हणून चांदोबा तिकडे गेला, आणि आकाशातल्या तारका खाली येऊन मोगरा, जुईच्या फुलांत सामावल्या.**



## पाठ क्रमांक ३

ही पांढरी छत्री आहे. दादा बाजारात जातो. त्याच्या अंगात लाल अंगरखा आहे.हातात वही घेऊन मामा जातो.  त्याच्या अंगावर पांढरी शाल आहे. मामा डाळ, तांदूळ आणतो, आणि भाजी आणतो, आणि कणिक आणतो. दादा पिकलेल सीताफळ सात आण्याला आणतो, शिवाय ऊस आणि जांब चार आण्याचे आणतो.

बाबा खाईल, काका खाईल आणि मामा खाईल. त्यानंतर काम आहे. बाबा कामाला जाईल.

दादा चार रुपये घेऊन बाजारात जातो.

आई म्हणलीय ‘खाजा’ पाहिजे, चिरोटे (पाकातल्या पुऱ्या) पाहिजेत, पनीर पाहिजे. आशादादा खाणाराय.

आशादादा आज ‘ढाक्या’हून आला. त्याचं घर ‘गडपार’मध्ये आहे.

आशादादा आणि त्याचा भाऊ ‘काला’ उद्या ढाक्याला परत जातील.

# कविता क्रमांक ३- नाव त्याचे मोतीतळे

नाव त्याचे मोतीतळे केवढे ते जल
हंस पोहती, करिती किती कलकल.
चिखलात उभा बक, उंच उडे घार
खंड्या झपकन झेपावतो पाण्यावर
इथेतिथे वस्त्या जाग्या, गवताखालून
जलधारा चाललेली वळून वळून
भातशेती अर्धी बुडलेली कोठे असे,
ऊन पडता त्यावरी दिव्य शोभा दिसे.
कृषक नावेने येतो, धान्य ते कापतो
कोळीगीते गात सांजेला तो परततो.
म्हशीसंगे गुराख्याचा पोर पार जातो
कोळी जाळी फेकुनिया मासे पकडतो.
ढग तरंगत आकाशातुनी चालती
शेवाळयाचे पुंज पाण्यावर तरंगती.

**हे एका तळयाचे वर्णन. त्या तळयात आणि आसपास कोण कोण राहते, ते काय काय करतात हे सगळे यात आले आहे.**

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा



बंगाली व्हिडिओ  पाहण्यासाठी
साठी स्कॅन करा



## पाठ क्रमांक ४

विनी आत्या वामि आणि दिदी त्या तिकडे आहेत. त्या तिघीजणी घाटावर जातात. वामि लोटी घेऊन जाते. ती मातीनं स्वतः लोटी घासते. राणी दिदी जात नाही. राणी दिदी घरीच आहे. तिला तर तीन दिवस खोकला येतोय. तिच्याजवळ आई, मावशी आणि किनी आहेत.चल भाऊ नीलू. ह्या तालवनातून वाट आहे, त्याच्यापुढे तिळाचं शेत, त्याच्यानंतर जवसाचं शेत आहे. त्याच्यानंतर मोठं तळं आहे,पाणी खूप निळं आहे. काठा-काठावर चिखल आहे. पाण्यात उजेड चमचम करतो.बगळा डोळे मिचकावतो आणि मासा धरतो. ही ती वामि, लोटी घेऊन घरी परत जाते.भाऊ घड्याळ आहे का? पाहतो, सहा तर वाजले.आणखी उशीर नको. आता मी घरी जातो. तू ये मागोमाग.पक्षी दाणा खाईल. पहा येऊन. हा कोणता पक्षी? हा तर पोपट. हा पक्षी काही शब्द बोलतो का? काय शब्द बोलतो? तो म्हणतो, राम राम हरी हरी.तो काय खातो? तो खातो दाणे (राळे). राणी दिदी त्याची वाटी भरून दाणे(राळे) आणते.म्हातारी दासी आणते पाणी. हा पक्षी उडतो का? नाही, हा पक्षी उडत नाही, त्याच्या पायात बेडी आहे.तो पूर्वी होता वनात. वनात नदी होती. तो स्वतः जाऊन पाणी प्यायचा. दिनूनं हा पक्षी पाळलाय.



# कविता क्रमांक ४- छायेचा घुंगट

छायेचा घुंगट मुखी ओढी
आमची छोटीशी आहे वाडी.
त्याच्यामध्ये एक तळे छान
चहुदिशी त्याच्या तालबन
मुरडते एक पायवाट
स्त्रिया घेऊनीया येती घट
वेळू ते खालती झुकतात
पाने झुरुझुरू डोलतात
रस्त्याकडेला एका ठिकाणी
दुकानी बसतो हरी वाणी
तांदूळ, डाळी, मीठ तेल ही
कात सुपारी विके चुनाही.
उखळी वृद्धा भात कांडते
चुलाण्यावर लाह्या फोडते.
विधू गवळण, संगे पोर
सकाळी गाईची काढी धार
कानाई बोलाई अंगणात
डाळी, राई रास रचतात.
थोरली मधली जावा दोन्ही
भिंतीला देती शेण्या थापुनी

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**या कवितेत आपल्याला एक छोटीशी टुमदार वस्ती भेटते. त्या वस्तीच्या आजूबाजूचा निसर्ग, वस्तीत चालणारे व्यवहार यांची आपल्याला ओळख होते. आजच्या शहरी जीवनात हे व्यवहार मुलांना कदाचित माहिती देखील नसतील.**



## पाठ क्रमांक ५

चूपचाप बसून झोप येते. चला फिरून येतो. फुलं तोडून आणतो. आज खूप थंडी आहे.आळूच्या पानांवरून टपटपत दव पडतंय. गवत भिजलंय. पावलं भिजून जातात. ‘दुखी’ म्हातारी चुलीजवळ, अंग आकसून बसून शेकते आणि गाणं गुणगुणते. गोपी टोपी काढून, शाल लपेटून झोपून आहे. त्याला गपचूप बोलावून आणतो. त्याला घेऊन जाईन बोरवनात. बोरं पाडून खाऊ. बोरीवर ‘टुनटुनी’नं घरटं बांधलयं. त्याला काही सांगत नाही.आज बुधवार, सुट्टी आहे. नुटू त्यामुळे अगदी खुश आहे.तो पण येईल बोरवनात. थोडे चुरमुरे आणि मीठ घेईन. वनभोजन होईल. करंडी घ्यायला हवी. त्यात बोरं भरून घरी येईन. उमा खुश होईल. उषा खुश होईल.सायंकाळ झाली. मैदान सुनं-सुनं वाटतं. राहून राहून सूं-सूं वारा वाहतो. दूरवर धूळ उडते. चुनी माळी विहिरीतून पाणी काढतो आणि पारवे घुमतात घू-घू.



# कविता क्रमांक ५- आमची छोटीशी नदी



आमची छोटीशी नदी चाले लचकत.
गुडघाभरच पाणी असे वैशाखात.
ओलांडून जाती गुरे, गाडी ओलांडते
दोन्ही कडा उंच, किनारे ते उतरते
चमचमे वाळू, नाही कोठेही चिखल
एका तटी काशबन फुले ती धवल.
साळुंक्यांचा थवा, कचकच किती बाई!
रात्री ऐकू येते कधी मधी कोल्हेकुई.
आंबराई, तालवन आसपास तिच्या
गावचा बामणपाडा छायेखाली त्याच्या
काठावरी मुलेमुली स्नान करताती
पंचात पाणी घेऊन अंगावर घेती
सांजसकाळला कधी स्नान ते करून
पंचा पसरून छोटे मासे धरतात.
लेकीसुना थाळया-लोट्या रेतीने घासती
कपडे धुवून घरकामाला त्या जाती
आषाढघन बरसे नदी भरते ती
उसळती लोट अति वेगाने वाहती
महावेगे खळखळ कोलाहल किती!
गढूळ जळी भोवरे गिरक्या घेताती
दोन्ही तीरी रानीवनी ऐकू येते साद
वर्षा उत्सवाला पाडा देतो प्रतिसाद.

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**इथे गावच्या नदीच्या अनुषंगाने ऋतूंचे वर्णन आहे. नदीला वैशाख महिन्यात किती पाणी असते आणि आषाढ मेघ बरसल्यावर ती कशी दुथडी भरून वाहते हे आपल्याला या कवितेत वाचायला मिळते.**

## पाठ क्रमांक ६-

वेळ जातोय, (अंगाला) तेल लावून पाण्यात डुबकी मारून येतो. नंतर मग खेळता येईल. एकटं-एकटं खेळता येत नाही. तिकडच्या घरातली काही मुलं आल्यास बरं होईल.

ते येताहेत, शची सेन, मणि सेन, वंशी सेन आणि ते येताहेत मधु शेठ आणि खेतू शेठ.  फुटबॉल छान खेळता येईल.

बॉल नाही. झाडावर दगड मरून बेलफळ पाडून घेऊ. तेली वस्तीच्या मैदानावर जाऊन खेळता येईल. खेळून झाल्यावर घरी परत येऊ. उशीर होणार नाही.

बाबा नदीवरून परत आले की जाऊ. गेल्यावर जेवण करून वही घेईन. लिहायचं बाकी आहे.

# कविता क्रमांक ६- आलासे शरद

आलासे शरद थंडीची चाहूल हवेच्या अंगांगी भरे
पहाटे पहाटे तृणांच्या टोकाशी दवाचे थेंब टपोरे.
आवळा वनाची होते थरथर ऊर धडधडे भारी
पानगळ सुरु होणार म्हणुनी ऋतूचा सांगावा दारी
प्राजक्ताच्या शाखा कळयांनी भरल्या, तगर डवरे फुली
मालतीलतेशी येती मधमाशा सांजेला आणि सकाळी
गगनी मेघ ते वर्षुनी रिकामे आता सुट्टी, काम नाही,
मजेत हवेत तरंगती, ना कशाची कसली घाई
तळयातील जल करे खळबळ काठावरी फुले नाना
भाताची कोवळी शेते बहरली वाऱ्याने डोलती माना
जिथे पाहू तिथे सोनेरी प्रकाश सुट्टीची दिसते छबी
पूजेच्या फुलांच्या वनी उगवतो पूजेच्या दिसाचा रवी

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**प्रत्येक ऋतूचे वेगळे वैशिष्ट्य, सौंदर्य असते. शरद ऋतूचे हे वर्णन टागोरांच्या शब्दातून आपल्याला अक्षरशः त्या ऋतूचा अनुभव देते. शरद ऋतूत बंगालमध्ये दुर्गापूजा असते. त्याचाही उल्लेख शेवटी ते करतात.**



## पाठ क्रमांक ७-

शैल आलाय कुठे? तो काय येतोय, तराफ्यावर बसून वल्ह्याने वल्हवत. आज त्याची मुंज आहे. अरे कैलास, दही पाहिजे. चांगलं म्हशीच्या दुधाचं दही आणि कोइ मासा पाहिजे.शैल आज लाह्या नी दही कालवून खाणाराय. दही तर गवळ्यानं दिलं नाही. लागलं नाही. कदाचित संध्याकाळी देईल. ‘मुंज होणाराय’ असं पत्र मिळाल्यावर मैनी मावशी आज आली. मैनी मावशी वैशाख महिन्यात होती नैनिताल मध्ये. तिला जायचंय ‘चोइबासा’ ला. तिचे बाबा राहतात ‘गैला’ मध्ये. गैला कुठे आहे?

तुला माहीत नाही? गैला बोरिशाल मध्ये आहे. तिथे असतो बेणी बैरागी.

आता तो असतो ‘नैहाटी’ त.

# कविता क्रमांक ७- काल होती फांदी रिती

काल होती फांदी रिती आज फुले बहरली
माळीदादा सांगा ना हो जादू कशी ही घडली?
झाडाच्या आतमधून होते त्यांचे जाणे-येणे
कुठे लपविती तोंड कुठे हो त्यांचे राहणे?
घरी कोपऱ्यात कान टवकारून लपती?
वारा बोलाविता त्यांना कसे बरे त्या ऐकती?
उशीर साहे ना आता त्वरेने त्या तोंड धुती
किती रंगांनी सजुनी घर सोडुनिया येती!
असते का सांगा त्यांचे मातीच्या जवळी घर?
दादा म्हणे मी जाणतो, आकाश हे त्यांचे घर
विविध रंगांचे मेघ येती-जाती रे तिथून
येते हवा, प्रकाशही गुप्त द्वार उघडून.

**एका फांदीवर अचानक एके दिवशी फुले बघून, आतापर्यंत ती कुठे लपून बसली होती हे ह्या लहानग्याचे कुतूहल चाळवले. बघा तो काय विचारतो आहे**

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा



बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा



## पाठ क्रमांक ८

सकाळ झाली. धोबी आला. हा तर ‘लोका’ धोबी आहे. ‘गोरा बाजारात’ त्याच घर आहे,त्याचा मुलगा खूप लठ्ठ, गोबऱ्या गालाचा आहे. ते त्याचं पाळलेलं गाढव आहे.त्याच्या पाठीवर बोचकं आहे. उघडून पहा त्यात धोतर आहे, सदरा आहे, मोजे,साडी आहे. आणखी किती काय काय आहे. त्याचा काका सूत विकतो, लोकर विकतो,त्याचा मावसा(मावशीचा नवरा) फुलांचे गुच्छ विकतो. धोबी धोतरं कुठे धुतो,माहीत आहे? ते जे तळं आहे,तिथे. त्यातलं पाणी फार गढूळ आहे. गाढवाला हरभरे खायला आवडतात. त्याला थोडे हरभरे खायला दे. हरभरे कुठे मिळतील? तो घोडा हरभरे खातो. त्याचा तबेला उघडा आहे. तो तिकडे मोठा वाडा आहे.तिथे आज लग्न आहे.म्हणून खूप घोडे आलेत, गाड्या आल्यात, हत्तीची एक जोडी आलीय. मधला मावसा हत्तीवर बसून येतोय.तो हत्ती म्हातारा आहे. त्याचा नातू घोड्यावर बसलाय. घोडा काळा आहे, पाठीवर पट्टे आहेत. त्याच्या पायाला फोड आहे, तो जोरात चालत नाही. ढोल वाजतो,घोडा खूप घाबरतो.

# कविता क्रमांक ८- दिवसा मी वेगळा नि  वेगळाच रात्री

दिवसा मी वेगळा नि वेगळाच रात्री
काय त्याचा अर्थ, स्वप्न पाहिले जे रात्री?
मला धरायाला आला जेव्हा छोटा काका
स्वप्नात उडत गेलो पसरुनी पंखां
काका म्हणे थांब, उंचावूनी दोन्ही हात
लगेच ये खाली, आहे जायचे शाळेत
मी म्हणालो, काका, का रे उगा ओरडशी
मेघ होऊनी उडतो आहे मी आकाशी
इंद्रधनू शोधूनी वाऱ्यासंगे येईन
प्रकाश अशोकपुष्प केसांत माळून
साता-समुद्रा पल्याड पारिजात वनी
पाणी घालायला जावे असे आले मनी
बोलत मी असताना असे, एकाएकी
कडाडली वीज दात आपुले विचकी
घाबरलो, आई ना जवळी, कुठे गेली?
माझ्याच हो बिछान्यात मला जाग आली

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**या कवितेतला लहान मुलगा स्वप्नांच्या दुनियेत मस्तपैकी विहार करून आला. काय काय दिसले त्याला?**



## पाठ क्रमांक ९

ये ये गौर ये, अरे कौलू पळत जा, चौरंग आण. गौर हातात हा डबा कसला आहे? हा डबा भरून बडीशेप ठेवतो. बडीशेप खाऊन छान वाटतं. तू कसा आलास गौर? नौकेनं आलो. कुठून आलास? गौरीपूर हून आलो. पौष महिन्यात जायचंय गौहाटीला. गौर माहीत आहे का, तो कोणता पक्षी आहे? तो तर ‘ बौ-कथा कओ’. नाही तो नाही. तो पाण्यात पक्षी आहे तो, जिथे कोळी ‘मौरला’ मासा धरतोय. तो तर पाणकौडी आहे. चला आता जेवायला चला, सौरी दिदी सैपाक तयार करून बसली आहे.

# कविता क्रमांक ९- नदीच्या घाटाच्या पाशी

नदीच्या घाटाच्या पाशी, नौका बांधलेली असे
पोहाया जातो मी तेव्हा, लाटांवर नाचतसे
आजही गेलो मी तिथे, पाहिले पल्याड दूर
नदीच्या मध्ये ती नौका, ओहोटीच्या बरोबर
कोण जाणे कोण्या देशी शेवटाला ती पोचेल
तिथल्या त्या माणसांचा, वेश हो कसा असेल?
घराच्या मी कोपऱ्यात, बसतो, येते मनात
असे तरंगत जावे, नव्या नगर – वनात
दूर सागराच्या पार, पाण्याच्या काठाकाठाने
नारळांची वनराई, सरळ उभी ओळीने.
पर्वत शिखर शोभे आकाशात निळया निळया
फोडून बर्फ तो, नाव नेणे ना जमे हो कुणाला
कोण त्या वनाच्या खाली, नवीन फुलाफळात
नवनवीन प्राणी हो फिरती ते समूहात?
नौका तरंगत जाते रात्री उशिराने किती,
बाबा ऑफिसऐवजी, नव्या देशी का न जाती?

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**नदीचा घाट, नौका, बघून ह्या मुलाचे स्वप्नरंजन सुरु झाले. ही नौका कुठे जाते, तिथली माणसे कशी असतील, निसर्ग कसा असेल याची तो कल्पना करतो आहे.**



## पाठ क्रमांक १०

बांबूच्या झाडावर वानर आहे. जितके हेलकावे देतं तितकी फांदी हलते.
त्याला पाहून पाँचू ला भीती वाटते. त्याने ओरखडा काढला तर!
बांबूच्या झाडावरून उडी मारून वानर गेलं चाफ्याच्या झाडावर. कधी उडी मारून खाली पडेल कोण जाणे!
आता वानराला भीती वाटलीय. दांडगं कुत्रं त्याला बघून भुंकतंय. खाँदु त्याला दगड मारून हाकलतोय. पाच वाजून गेलेत. टोपलीत कैऱ्या घेऊन मधू गल्लीमध्ये मोठ्यानं हाकारतोय.
अंधार झाला. ती, चापऱ्याच्या झाडाच्या फटीतून चंद्रकोर दिसतेय.
आकाशात थव्या –थव्याने हंस उडत गेले. दूरवर मंदिरात शंख वाजतो, काशाची घंटा वाजते. कानाई गच्चीत बसून बासरी वाजवतो.
ते कोण जणू रडतंय?
नाही ते रडूं नाही, काटेरी झाडावर घुबड ओरडतंय.

# कविता क्रमांक १०- किती दिस फुला वाटे

किती दिस फुला वाटे उडूनिया जावे,
मौजेने मनासारखे मुक्त विहरावे
एके दिनी मग त्याने पंख पसरले
कोठे ना मनाई, फुलपाखरू ते झाले.

दीपकाच्या ज्योतीलाही रोज हाच ध्यास
येईल बहार जर आले उडायास
अखेरीस तिज पंख लाभले क्षणात
काजवा बनली आता राहीना घरात.

तळ्यातल्या पाण्यालाही खंत वाटे मनी
किती आनंदाने पक्षी उडती गगनी
एकदा पाण्याने शुभ्र पंख पसरले
मेघ होऊनिया आकाशात झेपावले.

मला वाटे घोडा व्हावे, मैदानी दौडावे
वाटे मासा व्हावे, पाणी कापत पोहावे
वाटे पक्षी व्हावे, गगनात विहरावे
कधी खरे होईल जे मनी वाटे व्हावे?

मराठी व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

बंगाली व्हिडिओ
पाहण्यासाठी साठी स्कॅन करा

**या कवितेत तर टागोरांचा कल्पनाविलास बघून आपण थक्क होतो. मुलांच्या स्वप्नांना त्यांनी किती सुंदर शब्दरूप दिले आहे!**



**About Swadhar IDWC**

in 1995 as a branch of Swadhar Mumbai. Swadhar works towards development of women and children. Women, world over and particularly in India, have always been denied their rightful position in a family as well as the society. Making women aware of their rights is of vital importance if we wish to empower them. An empowered woman in turn will contribute to create a society where she is respected and her rights are protected. Swadhar began as a small effort by our founder late Prof. Meenakshi Apte with the able help of renowned social activist late Smt. Mrunal Gore.

Scope of Swadhar's activities expanded when child development related projects were also introduced. As the scope widened, Swadhar was registered as Swadhar IDWC (Institute for Development of Women and Children) in 1998. Since then the institution has been working for the cause, adding more activities to address newer needs of women and children as they become evident. Projects were instituted on Education, HIV–AIDS, Children in need of Care and Protection, Community Development and Vocational Training

**We Solicit your valuable contribution in various ways-**

- Become an active Member of Swadhar with participation in our activities
- Offer your Professional Services
- Contribute to Women's Development
- Contribute to Education, Health and Nutrition of a child
- Sponsor a Project/Development Programme
- Donate generously

(Donation to Swadhar IDWC, Pune are exempt from Income Tax under section 80G of the IT Act)

Swadhar IDWC, Pune is a registered organization working in Pune since 1995 with mission to provide services to women and children in order to ensure protection of their rights, self-reliance and empowerment for leading a dignified life.

Address: Swadhar IDWC–Pune, Flat No 301, Dhan-Shree Apt, Opp. Chittaranjan Vatika, Model Colony, Shivajinagar, Pune 411005
Phone: (020) 2565 8600

Email: president@swadharpune.org, rohini@swadharpune.org

Website: www.swadharpune.org